# ‘इन रिट्रीट’ मधून माणसाच्या मुळाचा शोध’

पुणे, दि. १८ फेब्रुवारी २०२५ : माणसाचा आपल्या मुळाचा शोध कायम सुरूच असतो, तो शोध एका प्रवासावर दाखवण्याचा प्रयत्न म्हणजे ‘इन रिट्रीट’ हा चित्रपट असल्याचे दिग्दर्शक मैसम अली यांनी सांगितले.

२३व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा(पिफ)मध्ये ‘इन रिट्रीट’ हा चित्रपट प्रदर्शित करण्यात आला. यानंतर मैसम अली यांनी चित्रपटाच्या प्रक्रियेबद्दल संवाद साधला.

लडाखच्या डोंगरावर रात्रीच्या शांततेत एक माणूस फिरत आहे. आजूबाजूचे सर्वजण मात्र त्यांच्या स्वत: च्या आयुष्यात व्यस्त आहेत आणि फिरणाऱ्या माणसाबद्दल कोणालाही काही फरक पडत नाही. मात्र त्या माणसाचा एक शोध सुरू असलेला या चित्रपटात दिसतो.

दिग्दर्शक मैसम अली म्हणाले, “या चित्रपटाचा विषय हा १९५० च्या दशकातील आहे. कथा एका वृद्ध माणसाभोवती फिरते, जो कित्येक वर्षे कुटुंबापासून दूर राहिल्यानंतर त्याच्या मूळ ठिकाणी परत आलेला आहे. जसजसा वृद्ध माणसाचा प्रवास सुरू होतो, त्याला त्याच्या मूळ जागेचा शोध लागत जातो तसतसा त्याला विविध आव्हानांचा सामना करावा लागतो. लडाखी भाषेवरील त्याची पकड कमी झाली आहे तसेच हा प्रदेश परदेशी आहे, असे त्याला वाटू लागते आणि मग हा प्रवास एका परकेपणात बदलतो.

मैसम अली म्हणाले, की हा चित्रपट कान्स आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलमध्ये ॲसिड कॅन्स साइडबार प्रोग्राममध्ये प्रदर्शित होणारा हा पहिला भारतीय चित्रपट आहे. या चित्रपटात लडाखी आणि हिंदी या दोन भाषा आहेत. ते म्हणाले, “मला

लडाखी ही भाषा माहीत आहे, परंतु जर मला कविता लिहावी लागली किंवा कवितेचा विचार करावा लागला तर मी ज्या भाषेत अधिक चांगल्या प्रकारे करू शकतो ते हिंदी किंवा इंग्रजी आहे. या चित्रपटात ते प्रतिबिंबित होते.”

**'लेवल क्रॉस'**

'लेवल क्रॉस' हा मानसशास्त्रीय अंगाने तयार केलेला चित्रपट गूढकथा आणि थ्रिलर दाखवणार आहे. चित्रपटाचे दिग्दर्शक अरफाज आयूब यांनी आज संवाद साधला. ते म्हणाले, “चित्रपटाची पटकथा मी स्वतः लिहिली असून त्यामध्ये खरे-खोटे, बरोबर-चूक, विश्वास-धोखा अशा गोष्टींतून चित्रपट पुढे जातो. ते म्हणाले, की केवळ तीन पात्रांमध्ये या कथेची मांडणी केली आहे. रघु, चैताली/शिखा आणि झिंचो या तीन पात्रांभोवती फिरणारी कथा आहे. ‘लेवल क्रॉस’ने मलाच मानसशास्त्रीय आणि दृश्यकलेबाबतीत खूप शिक्षण मिळाले.

**‘आणीबाणी’**

दिनेश जगताप दिग्दर्शित आणि अरविंद जगताप लिखीत मराठी चित्रपट ‘आणीबाणी’, हा चित्रपट आणीबाणी च्या काळातील सरकारच्या नसबंदी मोहिमेवर भाष्य करतो. १९७५ मध्ये तत्कालीन सरकारने लोकसंख्या नियंत्रणासाठी सक्तीची नसबंदी मोहीम राबवली होती, जी अनेकांसाठी त्रासदायक ठरली. चित्रपटात एका गावातील लोक, त्यांचे भीतीदायक आणि गमतीशीर अनुभव, तसेच त्या काळातील सामाजिक परिस्थिती यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. विनोदाच्या माध्यमातून प्रेक्षकांना त्या काळातील गंभीर परस्थिती वर विचार करायला चित्रपट भाग पाडतो आणि याच पार्श्वभूमीवर चित्रपटाची कथा उलगडत जाते. दिनेश जगताप म्हणाले की, आणीबाणी सारख्या घटनेवर मराठी मध्ये आजपर्यंत चित्रपट नव्हता म्हणून मी एक वेगळा विषय प्रेक्षकांसमोर आणण्याचे ठरवले. प्रेक्षकांना हा विषय रुचावा आणि त्याचा प्रभाव

त्या काळी काय होता हे आताच्या तरुण पिढीला अधिक चांगला पद्धतीने समजावे म्हणून आणीबाणी या गंभीर विषयाला विनोदी शैलीत मांडण्याचा निर्णय घेतला. चित्रपट २०२३ ला बनवला असल्यामुळे १९७५ साल आणि आता खूप गोष्टी बदलल्या आहेत म्हणून ते दाखवताना बऱ्याच आव्हानांना सामोरे जावं लागलं.

**'सिनेमॅन'**

महोत्सवात उमेश बगाडे लिखित आणि दिग्दर्शित 'सिनेमॅन' चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले. सिनेमॅन ही एका सिनेमावेड्या शिक्षकाची गोष्ट आहे. आनंद नावाचे शिक्षक स्वेच्छानिवृत्ती घेऊन लहान मुलांना सिनेमातून छोट्या छोट्या गोष्टी शिकवण्याचा प्रयत्न करताना दिसतात. ओंकार नावाचा चित्रपट सृष्टीत येऊ पाहणारा तरुण आनंदचे काम टिपत असतो. पुढे आनंदचा एक विद्यार्थी अंकुर एक काल्पनिक कथा लिहितो, जी लॉस एंजेलिस मधल्या एका लेखकाच्या गोष्टीची तंतोतंत जुळते. अशी या चित्रपटाची कथा आहे.

बगाडे म्हणाले, "कोल्हापूरच्या शहरी आणि ग्रामीण भागात, छोट्या वस्त्यांवर घडत जाणारा हा चित्रपट आहे. मी स्वतः कोल्हापूरचा आहे , त्यामुळे मला माझ्या भागाशी जोडणारा माझ्या भाषेत चित्रपट बनवायचा होता. आपल्या आजुबाजूच्या घटनांचा, सिनेमांचा लहान मुलांवर कळत नकळत परिणाम होत असतो. लहान मुलांनी नक्की काय पहावं याचा विचार करताना जाणवले की असे खूप कमी सिनेमे आहेत जे लहान मुले पाहू शकतात. यातूनच पुढे ही संकल्पना आकाराला आली. "

बगाडे म्हणाले, की ज्या मुलांकडे माध्यम पोहोचत नाही, जिथे सोई सुविधाचा अभाव आहे अशा ठिकाणच्या मुलांना सिनेमा दाखवून त्यांना त्यातून शिकायला मिळेल हा मूळ उद्देश या चित्रपटाचा आहे.

**'गिरण'**

विजय श्रीरंग खुडे दिग्दर्शित 'गिरण' हा चित्रपट समाजातील अंधश्रद्धेच्या गंभीर समस्येवर प्रकाश टाकतो. गिराण (गिरहाण) म्हणजे ग्रहण.
चित्रपटात एका समुदायातील एका विशिष्ट प्रथेचे चित्रण आहे, ज्यात ग्रहणानंतर नवविवाहित मुलगी दानधर्म करते. या प्रथेच्या माध्यमातून गावाची संकटे त्या समाजाकडे हस्तांतरित होतात, अशी समजूत आहे.

दिग्दर्शक खुडे म्हणाले, "मी बालपणीच्या अनुभवांवर आधारित ही कथा साकारली आहे. mee अनेकांच्या घरांमध्ये फिरून माहिती घेतली आणि जीवनशैलीचा, त्यांच्या समस्यांचा आणि त्यांच्या श्रद्धांचा अभ्यास करून चित्रपटाची कथा आणि पात्रे विकसित केली.

या चित्रपटात भक्ती घोगरे यांनी 'गुणा' या पात्राची भूमिका साकारली आहे. त्या म्हणाल्या, "मी स्वतः अंधश्रद्धेवर विश्वास ठेवत नाहीत. त्यामुळे हे पात्र साकारताना मला खूप विचार करावा लागला. आजही अनेक मुली अशा प्रथांमध्ये अडकल्या आहेत, याची मला खंत वाटते."